# काम

कामेच्छेइतके आदिम आणि योग्य नियोजन केल्यास निरामय आरोग्याचे दृष्टीने महत्वाचे असे दुसरे काहीही नाही. निरामय आरोग्य हे वैयक्तिकरीत्या कितीही जोपासायचा प्रयत्न केला तरी कामभावनेचा प्रादुर्भाव झाल्यावर जो ज्वर उत्पन्न होतो तो नीट सांभाळता न आल्यामुळे आयुष्यात दुःख उत्पन्न होते. स्त्रीपुरुषात कामेच्छा ही निसर्गदत्त आहे. तिचा स्थलकालानुसार योग्य आविष्कार होऊ देणे हे आरोग्यकारक असते. कोणत्याही वयाचे अगर नात्याचे स्त्री अगर पुरुष कोणत्याही कारणाने एकत्र आले तरी त्यांचे स्त्रीत्व अगर पुरुषत्व हेच त्यांच्यातील आकर्षणाचे अगदी मूळ कारण असते.

भलत्या कल्पनांच्या आहारी जाऊन कामेच्छा दाबून टाकलेले विकृत लोक पूर्वी तर असंख्य होते पण आजही दिसतात हे नवल आहे. ही अहंकाराची परमावधि आहे आणि अहंकार हा नेहेमीच दुःखकारक असतो. निसर्गदत्त अशा गोष्टीला आपल्या सुमार दर्जाच्या अकलेने त्याज्य ठरवणे हे विनोदी आहे हेदेखील कित्येकांच्या लक्षात येत नाही. स्त्रीपुरुषांना एकमेकांवर मनमोकळे प्रेम करता येणे हे कामशक्तीला योग्य मार्ग दाखविणे आहे. हे प्रेम कोते नसते. माझे एखाद्या स्त्रीवर प्रेम आहे म्हणजे तिनेही माझ्यावर प्रेम केलेच पाहिजे हे विचित्र आहे. किंवा माझे कुणा व्यक्तीवर प्रेम आहे आणि त्या व्यक्तीचे माझ्यावर प्रेम आहे याचा अर्थ त्या व्यक्तीने आता दुसऱ्या कुणावरही प्रेम करता कामा नये असे समजणे योग्य नव्हे. एकाच वेळेस अनेकांवर प्रेम करणे अगर प्रेमात राहणे सहज शक्य असता माणसे एकामेकांचे बोनसाय करण्यात गुंतून राहतात. परिणामी असमाधानी राहतात. आपल्यावर प्रेम करणाऱ्या अगर आपण ज्यांच्यावर प्रेम करतो अशा लोकांची संख्या वाढती राहिली पाहिजे. ती कमी कमी होत गेली तर आयुष्य क्षुद्र होऊन जाते.

प्रेम हे नुसत्या दृष्टीने व्यक्त करता येते, शब्दाने, स्पर्शाने, अगर शरीरसंबंधाने देखील व्यक्त करता येते. प्रेम याचा अर्थ आता फक्त शरीरसंबंध असा करणे हे योग्य नव्हे. मुळात शरीरसंबंधाबाबत विनाकारण गुप्तता पाळल्यामुळे असे होते. दोघांनाही कोणताही शारीरिक, मानसिक अगर सामाजिक त्रास न होता शरीरसंबंध ठेवता आला तर समाजाचा आरोग्य स्तर उंचावेल. स्त्रीपुरुष एकमेकांशी जास्त प्रेमाने, सन्मानाने आणि जवळिकीने वागतील.

कामशक्तीचे योग्य उन्नयन न झाल्याने हिंसाचार, आणि लैंगिक गुन्हे होत असतात. स्त्रीपुरुषांना एकमेकांच्या साहचर्याची जिथे पूर्ण मुभा असते अशा आदिवासी समाजात लैंगिक गुन्हे होत नाहीत. अशा आदिम समाजांपासून आपल्याला याबाबतीत बरेच शिकण्यासारखे आहे. आपल्या समाजात स्त्रीच्या अनेक रूपांची पूजा केली जाते पण सामान्य व्यवहारात विशेषतः लैंगिक व्यवहारात सामान्य स्त्रीला सन्मान देणे हे निरामय लैंगिक स्वास्थ्यासाठी अत्यावश्यक असते. अशा व्यवहारात स्त्रीशरीर "वापरणे" अगर स्त्रीची तशी भावना होणे अत्यंत अयोग्य आणि अस्वस्थता उत्पन्न करणारे असते. हे वारंवार होत राहिल्यास पर्यवसान दुःखात होते.

स्त्रीपुरुषांत चतुर साहचर्य उत्पन्न झाले पाहिजे. याचा अर्थ असा स्त्री आणि पुरुष हे विचार आचार आणि उच्चाराने संपूर्ण वेगळे आहेत. त्यांच्यात कोणतीही साम्यस्थळे नाहीत. पण म्हणूनच त्यांच्यात एकमेकांविषयी एक अनावर ओढ आहे. अशा वेळेस स्त्री पुरुषांनी एकमेकांच्या गुणांना उठाव दिला पाहिजे आणि एकमेकांचे अवगुण लक्षपूर्वक दुर्लक्षिले पाहिजेत. एकमेकांविषयी कधीही भीतीची किंवा तिरस्काराची भावना उत्पन्न होत असल्यास तिच्या मुळाशी जाऊन तिचे उन्नयन करता आले पाहिजे. अशाने समाजाची ऊर्जा वाढती राहील.